REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २८ फेब्रुवारी, १९४० | अंक ९

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

अप-टु-डेट शिलाईकरितां

## महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार चौक, पुणें

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### लॉइड्स बँक लि.

वरील बँकेस १९३९ मध्यें २ कोटि, १० लक्ष रुपये नफा झाला.

### दत्तात्रेय कृष्ण सांडु ब्रदर्स चेंबुर, लि.

वरील नांवानें खासगी लिमिटेड कंपनी नोंदण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल ७ लक्ष रुपये असून श्री. गोविंद कृष्ण सांडु हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### मुंबई ते कलकत्ता वैमानिक वहातूक

मुंबई ते कलकत्ता वैमानिक वहातुकीस प्रारंभ करण्यांत यावयाचा असून त्याच्या पूर्वतयारीचें काम चालू आहे.

### व्यापारी करार

इटली आणि तुर्कस्तान, ग्रेट ब्रिटन आणि नॉर्वे व इटली आणि जर्मनी ह्यांचेमध्यें अनुक्रमें तीन व्यापारी करार झाले आहेत.

### ब्रिटिश माल घ्या

"शक्य तेवढा ब्रिटिश, निदान ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांचा माल घ्या. त्यामुळें ब्रिटिश निर्गत व्यापार वाढून युद्धाचा खर्च भागविण्यास ग्रेट ब्रिटनला सहाय होईल." कलकत्ता ट्रेड्स असोसिएशनचे मास्टर, मि. हॅमिल्टन ह्यांनीं असोसिएशनचे वार्षिक सभेचे वेळीं सभासदांस वरील सूचना केली.

### जादा नफ्यावरील कर आणि विमा कंपन्या

जादा नफ्यावरील कराचा कायदा आयुर्विमा कंपन्यांस लागू पडूं नये, अशी त्यांत दुरुस्ती मध्यवर्ती विधिमंडळाच्या सिलेक्ट कमिटीनें सुचविली आहे. इतर प्रकारच्या विमा कंपन्यांस, कर आकारणी करावयाच्या मामुली नफ्याचे संबंधांत थोडी सवलत मिळावी, अशी दुरुस्ती सरकारनेंच सुचविली असल्याचें समजतें.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या दुय्यम कंपन्या

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. च्या तीन दुय्यम कंपन्या आहेत. सेंट्रल बँक एक्झिक्यूटर ॲन्ड ट्रस्टी कंपनी, डिपॉझिटर्स बेनिफिट इन्शुअरन्स कंपनी आणि सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया ह्या त्या कंपन्या होत. एक्झिक्यूटर ॲन्ड ट्रस्टी कंपनीस गेल्या वर्षी ५४ हजार रुपये नफा झाला. डिपॉझिटर्स बेनिफिट इन्शुअरन्स कंपनीचा विमाखातीं फंड गेल्या वर्षांत ६ लक्ष, २९ हजारांचा ७ लक्ष, ५६ हजार रुपये झाला. एक्सचेंज बँकेनें ३१ मार्च, १९३९ अखेर संपलेल्या वर्षांत सुमारें १५ हजार रुपये तोटा दाखविला. पहिल्या दोन कंपन्यांपासून मूळ बँकेस मिळालेलें डिव्हिडंड व्याज खातीं जमा घेतलें असून एक्सचेंज बँकेस आलेल्या नुकसानीची मूळ बँकेच्या नफ्यांतून तरतूद करण्यांत आली आहे.

### पोलाद कंपन्यांचें सहकार्य

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनी व स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉल लि. ह्यांनीं आपले व्यवहार सहकार्यानें चालविण्याचें ठरविलें आहे. दोघांनीं आपली विक्रीची व्यवस्था स्वतंत्रपणें करावयाची नसून, त्यांनी मालाची यादीहि एकत्र छापावयाची आहे. मालाच्या मागणी–पत्रकावर दोन्ही कंपन्यांचीं नावें असतील आणि त्यांपैकीं कोणतीहि कंपनी माल पुरवील तो मागविणारानें स्वीकारला पाहिजे. अशा प्रकारची ही नवीन व्यवस्था आहे.

### औषधें पाहून घ्या

युद्धामुळें औषधांचा पुरवठा पुरेसा होत नाहीं, त्याचा फायदा घेऊन कांहीं दुकानदार आपल्या गिऱ्हाइकांस फसवीत आहेत आणि आवश्यक ते गुण नसणारीं द्रव्यें एकत्र करून नकली औषधें विकीत आहेत, असें मुंबई सरकारच्या नजरेस आलें आहे. साहजिकच अशा औषधांचा अपेक्षित उपयोग होऊं शकत नाहीं. ह्यासंबंधांत जनतेचें लक्ष वेधणारें एक पत्रक सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँक काळबादेवी येथें आपली शाखा ११ मार्चपासून सुरू करणार आहे.

### युद्ध आणि तागाचा धंदा

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत बंगालमधील तागाच्या गिरण्यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांस सुमारें ११½ कोटि रुपयांचीं तागाचीं पोतीं पुरविलीं. आलेली मागणी सर्व गिरण्यांस वाटून देण्यांत आली. गेल्या तीन वर्षांमध्यें ताग पेरणाऱ्या शेतकऱ्यांस दरसाल सुमारें २५ कोटि रुपये मिळाले; चालू वर्षी हा आकडा ५५ कोटींवर जाईल अशी अपेक्षा आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील रहाणीचें वाढतें मान

| काळ | रहाणीचें मान |
|---|---|
| १९१४ | १०० |
| युद्धापूर्वी | १५५ |
| १ फेब्रुवारी १९४० | १७७ |

### हुंडणावळ स्थिर राखण्याचा प्रयत्न

अमेरिकन डॉलर, बेल्जियन फ्रँक, नॉर्वेचे क्रोनर, हॉलंडचे गिल्डर्स, स्वित्सरलंडचे फ्रँक, इत्यादि विदेशी चलन हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांमधील अधिकृत विक्रेत्यांकडून विकत घेण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे. विकत घ्यावयाच्या विदेशी चलनाची किमान किंमत १ लक्ष रुपये तरी भरली पाहिजे. अधिकृत विक्रते विदेशी चलनाची मोठ्या प्रमाणावर खरेदी करतील, त्यांस आपले व्यवहार सुरक्षित करण्यास हें साधन उपलब्ध होईल.

### कॅश सर्टिफिकिटांबाबत नवा नियम

कॅश सर्टिफिकेट दुसऱ्या एखाद्यानें घेऊन तें लबाडीनें वटवलें आणि त्यामुळें ते धारण करणाराचें नुकसान झालें तर त्याबद्दल पोस्ट ऑफिस जबाबदार नाहीं, अशी कॅश सर्टिफिकिटांबाबतच्या नियमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे.

### स्वीडन

स्वीडनची लोकसंख्या ६० लक्ष आहे. रशियानें फिनलंड घेतलें, कीं स्वीडन फार दूर नाहीं! स्वीडनमध्यें लोखंडाच्या मोल्यवान खाणी आहेत. त्या देशाच्या किनाऱ्याची लांबी १,४०० मैल आहे. स्वीडनमधील लोकांची रहाणी ब्रिटिश लोकांच्या रहाणीपेक्षा उच्च दर्जाची आहे.

### बेंगॉल–डूर्स रेल्वे

बेंगॉल रेल्वे कंपनीकडून हिंदुस्थान सरकार बेंगॉल डूर्स रेल्वे विकत घेणार आहे. खरेदीची किंमत (सुमारें १½ कोटि रुपये) १९४१–४२ मध्यें हॉलंडमध्यें दिली जाईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ | ६ प्रो. काळे ह्यांचें भाषण | १०२ |
| २ साखरेचा पुरवठा ... | ९९ | ७ ब्रिटिश एक्सचेंज ईक्वलाय-झेशन फंड ... | १०३ |
| ३ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | १०० | ८ बँक आणि खातेदार | १०४ |
| ४ रॉयटर्स ... | १०० | ९ कानडी मार्फतून ब्रॉडका-स्टिंग करा ... | १०४ |
| ५ स्फुट-विचार ... | १०१ | १० पेढीवाल्यांच्या कर्जवसुलींतील अडचणी ... | १०५ |
| मध्यवर्ती असेंब्लींत रेल्वे बजेटावर चर्चा–रेल्वेजचा आतबट्ट्याचा व्यवहार–सर ॲन्ड्र्यू क्लो ह्यांचें उत्तर–युद्ध आणि रॉकेल तेल–इरिगेशन खात्याचा अहवाल | | ११ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें साप्ताहिक पत्रक | १०६ |
| | | १२ निवडक बाजारभाव | १०७ |



# अर्थ

बुधवार, ता. २८ फेब्रुवारी, १९४०


## साखरेचा पुरवठा—इंग्लंडमध्यें नियंत्रण

खाण्यापिण्याचे व इतर जिन्नस लोकांच्या पुरवठ्यास येऊन युद्धोपयोगी मालाच्या आयात व्यापारावर ताण पडूं नये ह्या उद्देशानें इंग्लंडमध्यें ह्या जिन्नसांच्या उपयोगाचें नियंत्रण करून त्यास सरकारनें मर्यादा घालून दिल्या आहेत. आणीबाणीच्या काळांत युद्धोपयोगी मालास पहिल्या प्रतीचें महत्त्व द्यावें लागतें आणि फौजा, आरमार व आकाशयानें ह्यांच्या गरजा पूर्णत्वानें भागल्यानंतरच जनतेच्या वाट्यास जरूरीचे पदार्थ येणें अपरिहार्य होतें. जनतेच्या जीवनास लागणाऱ्या वस्तु युद्धकाळांत मामुली प्रमाणांत मिळणें अशक्य होतें. व्यापारी जहाजें व वहातुकीचीं साधनें युद्धसामुग्री पुरवण्यांत प्रथम गुंतवावीं लागतात, ह्यामुळें जरूरीच्या जिनसांच्या अपुऱ्या पुरवठ्यापासून होणाऱ्या गैरसोयी जनता मुकाट्यानें सोसते. युद्ध जिंकणें ही पहिल्या प्रतीच्या जिव्हाळ्याची गोष्ट असते आणि इतर बाबी तिच्यामानानें दुय्यम प्रतीच्या समजाव्या लागतात. बाहेरून आणाव्या लागणाऱ्या मालाची किंमत परदेशांत द्यावी लागते आणि युद्धामुळें निर्यात व्यापार मर्यादित होत असल्याकारणानें परराष्ट्रीय येण्यापेक्षा देणें अधिक होतें. ह्याचा परिणाम परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरावर प्रतिकूल प्रकाराचा होतो आणि राष्ट्रीय चलनपद्धतीची घडी विस्कटण्याचा बिकट प्रसंग प्राप्त होतो. ही आपत्ति टाळण्यासाठी आयात व्यापाराच्या मालाचा पुरवठा शक्य तेवढा कमी करावा लागतो. असें केलें म्हणजे परराष्ट्रीय देण्याची रकम मर्यादित होऊन चलन व हुंडणावळ ह्यांची व्यवस्था नीट रीतीनें संभाळण्यास सहाय मिळतें. युद्धांत पडलेल्या आणि तटस्थ राष्ट्रांतहि आपल्या जनतेनें नित्याच्या उपयोगांत आणण्याच्या जिनसांच्या बाबतींतील मर्यादा घालण्याचें तेथील सरकारांस भाग पडतें.

इंग्लंडमध्यें कित्येक जिनसांच्या बाबतींत ह्या तऱ्हेचें नियंत्रण घालण्यांत आलें आहे, त्याचें रहस्य वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. ह्या जिनसांपैकीं साखरेसंबंधांत माहिती येथें देण्याचा विचार आहे. साखरेच्या खपाच्या बाबतींत सर्व जगांत इंग्लंडचा नंबर फार वर लागतो. हा खप एकतृतीयांशानें कमी करण्यांत आला आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं इंग्लंडला साखरेचा पुरवठा मुख्यत्वेंकरून जर्मनी व ऑस्ट्रिया–हंगेरी ह्या देशांतून मोठ्या प्रमाणांत होत होता. प्रस्तुत युद्धांतली परिस्थिति अगदीं वेगळी आहे. प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें पावणेपांच लक्ष टन इतकी बीटापासून साखर तयार होते आणि बाकीची ब्रिटिश साम्राज्यांतील देशांमधून येते. त्या देशांतला मामुली खप सुमारें २२ लक्ष टन आहे. म्हणजे हिंदुस्थानांत स्वदेशी साखरेचें जेवढें एकूण उत्पादन कारखान्यांत होतें त्याच्या दुप्पट साखर इंग्लंडमध्यें प्रतिवर्षी खपते. हा खप आतां ब्रिटिश सरकारानें मर्यादित केल्यामुळें तो सुमारें १७–१८ लक्ष टन इतका होईल. ह्यापैकी पावणेपांच लक्ष टन साखर प्रत्यक्ष इंग्लंडमध्येंच तयार होईल आणि बाकीच्या पुरवठ्यासाठी ब्रिटनला परराष्ट्रांच्या तोंडाकडे पहाण्याची आवश्यकता भासणार नाहीं. चालू सालीं ब्रिटिश स्थानिक साखरेचा पुरवठा वाढावा म्हणून बीटाच्या गड्ड्यांच्या किंमती चढवण्यांत आल्या आहेत आणि त्या मार्गानें बीट पिकवणाऱ्या शेतकऱ्यांस उत्तेजन देण्यांत येत आहे. इंग्लंडला १२ लक्ष टन साखर ब्रिटिश साम्राज्यांमधून मिळेल आणि ह्या बाबतची व्यवस्था सरकारनें केलीहि आहे. साम्राज्याबाहेरील देशांतून साखर आयात करण्याची आवश्यकता आतां उरणार नाहीं आणि तिच्या किंमतीच्या देण्याचा प्रश्न उद्भवणार नाहीं व हुंडणावळी बाबतची अडचण टळणार आहे.

साखरेचा खप इंग्लंडनें कमी केल्याचा आणि परराष्ट्रीय साखरेची आयात बंद केल्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारावर अर्थातच होणार आहे. क्यूबा, जाव्हा, इत्यादि परदेशांतून इंग्लंड सुमारें १२ लक्ष टन साखर घेत असे. ह्यापैकीं निम्मी किंवा त्यापेक्षा अधिक साखर इंग्लंडमध्यें वापरली जात असे आणि बाकीची सुधारलेल्या स्वरूपांत पुन्हां परदेशांत पाठवण्यांत येत असे. युद्धामुळें साखरेचा हा निर्गत व्यापार नाहींसा झाला आहे. जगांतला साखरेचा पुरवठा अलीकडे बेतांत आला होता, तो पुन्हां वाढून साखरेचें उत्पादन करणाऱ्या देशांच्या मार्गांत अडचण उपस्थित झाल्यावाचून रहाणार नाहीं. ब्रिटिश बाजारपेठ मर्यादित झाली असतां ह्या देशांस आपली साखर खपवण्याची पंचाईत पडणार आहे. त्यांस आपलें उत्पादन वेळींच मर्यादित करण्यावांचून गत्यंतर नाहीं. ब्रिटिश सरकारानें स्वतःच्या तिजोरींतून ६० कोटि रुपये खर्चून आपल्या देशांतल्या साखरेच्या धंद्यास सहाय दिलें, त्या उत्तेजनाचें फळ त्या राष्ट्रास आज अनुभवायास मिळत आहे. हिंदुस्थानांतील स्वदेशी साखरेच्या धंद्याची जोपासना ह्या रीतीनेंच करण्यांत आली पाहिजे. हिंदी साखरेच्या पुरवठ्याचा उपयोग युद्धकालांत ब्रिटिश सरकारास होणार आहे. परराष्ट्रीय मालाच्या स्पर्धेपासून हिंदी साखरेचें संरक्षण उपस्थित होणाऱ्या परिस्थितींत करण्याची व्यवस्था वेळींच होणें अगत्याचें आहे. हिंदी साखरेस जकातीचें संरक्षण आहे. त्याचा उपयोग ह्या देशास परदेशी साखरेवरील अवलंबनापासून मुक्त करण्यास उत्कृष्ट झाला आहे. स्वदेशी साखरेच्या उत्पादनावर अगोदरच पट्टी बसवण्यांत आली असून जादा नफ्यावरील जबर कराचा बोजा ह्या धंद्यावर पडण्याची भीति उपस्थित झाली आहे. रेल्वेच्या वहातुकीचे दर वाढवण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवून आणखी एक अडचण पुन्हां त्याचे मार्गांत उत्पन्न केली आहे. साखरेसारख्या महत्त्वाच्या स्वदेशी धंद्यास कोणत्याहि रीतीनें धक्का बसणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेण्याचें त्या सरकारचें कर्तव्य नाहीं काय?

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

### चवथी वार्षिक सभा

रविवार ता. २५ फेब्रुवारी १९४० रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेचें राजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें शहर, येथें प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं बँकेच्या भागीदारांची वार्षिक साधारण सभा भरली होती. त्यावेळीं बँकेच्या हिशेब तपासनिसांनीं तपासून दाखला दिलेला ता. ३१ डिसेंबर १९३९ रोजींचा ताळेबंद व त्या दिवशीं पुऱ्या होणाऱ्या वर्षाचें नफातोटापत्रक हीं भागीदारांस सादर करण्यांत आलीं.

अहवालाच्या सालांत बँकेस तिच्या व्यवहारांत मागील सालांतील शिल्लक रु. ९५-०-२ धरून रु. १९,२९५-१५-४ इतका नफा झाल्याचें दिसून येतें. या रकमेची खालीलप्रमाणें वांटणी व्हावी अशी डायरेक्टरांची सूचना सभेनें मान्य केली:—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड ( सदर फंड आतां रु. ११,०००/—होईल. ) | रु. ४,०००—०—० |
| कॉंटिन्जन्सी फंड ( सदर फंड आतां रु. १७,०००/—होईल. ) | रु. ८,०००—०—० |
| संशयित आणि बुडीत कर्जाकरितां रिझर्व्ह | रु. १,०००—०—० |
| शेअरबद्दल भरलेल्या रकमेवर ता. ३१ डिसेंबर १९३९ रोजीं पूर्ण होणाऱ्या वर्षासाठीं द. सा. द. शे. ३½ टक्केप्रमाणें प्राप्तीवरील कर माफ डिव्हिडंड देणें | रु. ४,९१५-१४-९ |
| नोकरवर्गास बोनस | रु. १,०००—०—० |
| पुढील सालच्या हिशेबांत ओढण्यास | रु. ३८०—०—७ |
| | रु. १९,२९५-१५-४ |

" ताळेबंदामधील आकड्यांवरून रिपोर्टाच्या सालीं बँकेची प्रगति समाधानकारक रीतीनें झाली असल्याचें पाहून भागीदारांस आनंद वाटेल असा डायरेक्टरांस विश्वास वाटतो. बँकेच्या मुंबई शाखेची हळुहळु सारखी प्रगति होत आहे हेंहि डायरेक्टरांस भागीदारांच्या नजरेस आणावयाचें आहे. रिपोर्टाचें वर्ष महायुद्धाच्या ढगांनीं व्यापलें होतें हें प्रसिद्धच आहे; आणि त्याच्या शेवटच्या तिमाहींत तर महायुद्धास प्रत्यक्ष प्रारंभहि झाला. अशा प्रतिकूल आर्थिक परिस्थितींतहि गेल्या वर्षी बँकेच्या व्यवहारांत उत्तेजनकारक प्रगति झाली ही गोष्ट बँकेस लाभलेला जनतेचा वाढता विश्वास व तिची दक्षतेची कार्यपद्धति यामुळेंच शक्य झाली. बँकेच्या मॅनेजरांनीं आपल्या मदतनीसांच्या एकनिष्ठ व कार्यतत्पर सहायानें आपलीं कर्तव्यें उत्साहानें व कार्यक्षम पद्धतीनें पार पाडलीं याबद्दल डायरेक्टरांस समाधान व्यक्त करणें आवश्यक आहे. भागीदारांनीं स्वतः बँकेचे जास्त भाग खरेदी करून त्यांची आपल्या मित्रांस शिफारस करावी आणि बँकेस वाढता पाठिंबा द्यावा अशी गतवर्षाप्रमाणेंच पुन्हां डायरेक्टरांची विनंति आहे. " अशा अर्थाच्या डायरेक्टरांच्या रिपोर्टाचा सभेनें स्वीकार केला.

डायरेक्टरांपैकीं तिघेजण म्हणजे श्री. वा. पुं. वर्दे, श्री. र. चिं. सोहोनी आणि मि. फ. वों. पदमजी बोर्डातून निवृत्त होत होते. त्यांची फेरनिवडणूक झाली. चालू सालाकरितां बँकेचे पूर्वीचेच ऑडिटर्स, श्री. वि. ग. जोशी व श्री. गो. द. आपटे ह्यांची नेमणूक करण्यांत आली. श्री. आ. रा. भट ह्यांनीं आभारप्रदर्शन केलें.

## रॉयटर्स

बातम्या गोळा करून त्या पुरविण्याचें काम करणारी रॉयटर्स ही संस्था वृत्तपत्रांच्या वाचकांस परिचयाची आहे. सुमारें १०० वर्षांपूर्वी एका जर्मन बँकेंतील ज्यूलियस रॉयटर ह्या कारकुनास सुचलेल्या एका कल्पनेंत ह्या संस्थेचें मूळ आहे. ब्रुसेल्सहून येणाऱ्या बाजारभावांवर बँकर्सचे व्यवहार अवलंबून असतात, हें जाणून एला चॅपेल ते ब्रुसेल्स ह्यांचेमध्यें कबुतरांचे मार्फत टपाल आणण्या नेण्याची त्यानें व्यवस्था केली, अशा रीतीनें पॅरिसचे बाजारभाव वक्तशीर आणि तातडीनें उपलब्ध होण्याचें साधन निर्माण झालें. कांहीं वर्षांनीं रॉयटर इंग्लंडमध्यें आला आणि तेथेंहि त्यानें बातमी पुरविण्याच्या धंद्यास प्रारंभ केला. पूर्वी तो केवळ बाजारविषयक बातम्या पुरवी, आतां तो सर्वसामान्य बातम्याहि पुरवूं लागला रॉयटर्स आणि त्याशीं संलग्न असलेल्या संस्था ह्या दरसाल बातम्या जमा करण्यासाठीं आणि त्या पुरविण्यासाठीं सुमारें ८ कोटि रुपये खर्च करतात. बातम्या तातडीनें पुरविण्याचें महत्त्व आतां पूर्वीपेक्षा शतपटीनें वाढलें आहे. न्यूयार्क येथील बाजारभाव मुंबईस एका मिनिटाचे अवधींत कळूं शकतात. आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा पांच मिनिटें अगोदर बातमी कळणें हा मोठा पराक्रम समजला जातो आणि अर्ध्या तासाचें अंतर पडलें म्हणजे तर प्रतिस्पर्ध्यास चारी मुंड्या चीत केल्याचें श्रेय मिळतें. बातमी जशी तातडीनें कळली पाहिजे, तशीच ती बिनचूकहि असणें आवश्यक आहे आणि त्यासाठीं बातमीदारांनीं निर्विकारपणें आपलें काम केलें पाहिजे.

ज्यूलियस रॉयटर हा इंग्लंडमध्यें स्थाइक झाला आणि त्यानें १८६५ पर्यंत बातमी पुरविण्याचें काम स्वतःच केलें. त्या वर्षी त्यानें तें रॉयटर्स टेलिग्रॅम कंपनी लि. कडे वर्ग केलें आणि ह्या नवीन कंपनीचा तो प्रमुख बनला. १८७९ सालीं तो निवृत्त झाला. त्यावेळीं तो श्रीमान आणि कीर्तिमानहि झाला होता. त्यास बॅरन करण्यांत आलें. त्याच्यानंतर त्याचा पुत्र बॅरन हरबर्ट हा रॉयटर्स कंपनीचा प्रमुख बनला. त्याचे मृत्यूनंतर गेल्या महायुद्धाचे सुमारास सर रॉड्रिक जोन्स ह्यांस ती जागा मिळाली आणि आज तोच त्या ठिकाणीं आहे रॉयटर्स कंपनीच्या भागांची शेअर बाजारांत खरेदी—विक्री होत असे आणि हे भाग शत्रुपक्षीयांच्या हातीं जाणें अशक्य नव्हतें. ह्यासाठीं सर रॉड्रिक जोन्सनें चार मित्रांचे करवीं सर्व भागांचा ताबा मिळविला. ह्या पांच जणांच्या खासगी कंपनीचा सर रॉड्रिक हा एकमेव एक्झिक्यूटिव्ह ट्रस्टी बनला. आपल्या मृत्यूनंतरहि रॉयटर्सचें काम व्यवस्थित चालावें ह्याकरितां त्यानें कायमची व्यवस्था केली आहे. रॉयटर्सनें अनेक ब्रिटिश वृत्तपत्रांना प्रेस असोसिएशनच्या स्वरुपांत आपल्या एजन्सींत भागीदार करून घेतलें आहे. अशा रीतीनें, सर रॉड्रिकच्या मृत्यूनंतर प्रेस असोसिएशनकडे रॉयटर्स लि. चा ताबा जाईल. प्रेस असोसिएशन ही इंग्लंडमधील वृत्तपत्रांची सहकारी स्वरूपाची एक संस्था आहे. जगांतील प्रत्येक देशांतील प्रमुख वृत्तसंस्था आणि रॉयटर्स ह्यांचेमध्यें करार झालेले असून रॉयटर्सचें जाळें जगभर पसरलेलें आहे.

# स्फुट विचार

### मध्यवर्ती असेंब्लींत रेल्वेबजेटावर चर्चा

मध्यवर्ती असेंब्लीस रेल्वेबजेट गेल्या आठवड्यांत सादर करण्यांत आलें आणि त्या बजेटावरील सर्वसाधारण चर्चा संपून तपशीलवार मागण्यांवरील चर्चेस प्रारंभ झाला आहे. सर्वसाधारण चर्चेस श्री. ए. सी. दत्त ह्यांनीं सुरवात केली आणि रेल्वेचे दर वाढविण्याच्या सूचनेविरुद्ध त्यांनीं जोराची तक्रार केली. हिंदुस्थानांतील परिस्थिति लक्षांत घेतां, रेल्वेचे दरांत वाढ करण्याची अद्याप वेळ आलेली नाहीं आणि ह्या वाढीचा उद्योगधंदे, व्यापार आणि शेती ह्यांवर प्रतिकूल परिणाम होईल असें ते म्हणाले. बजेटाची तोंडमिळवणी करण्यासाठी मोठ्या पगारांत कपात करण्याचा, भारी पगाराच्या जागा कमी करण्याचा, चालू खर्चांत बचत करण्याचा आणि पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंस देण्यांत येत असलेल्या सुखसोयी कमी करण्याचा मार्ग सोडून देऊन सरकारनें दर वाढविण्याचें ठरविलें ह्याबद्दल श्री. दत्त ह्यांनीं तीव्र नापसंति व्यक्त केली. येत्या एका वर्षी सुमारें २ कोटि रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्याची सूचना अव्यावहारिक आहे, असें ते म्हणाले. कनिष्ठ नोकरांसाठी सुरू केलेल्या प्रॉव्हिडंड फंड योजनेचें श्री. ना. म. जोशी ह्यांनीं स्वागत केलें. शेतीच्या मालास दरांतील वाढ लागू न करण्यांत हिंदी शेतकऱ्यांचेपेक्षा ग्रेट-ब्रिटन आणि फ्रान्स ह्या देशांचें हित साधतें, कारण त्यांस हिंदी कच्चा माल हवा आहे, अशा प्रो. बानर्जी ह्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता. सर हेन्री गिडने ह्यांनीं सर्व रेल्वेनोकरांचा पगार १०% वाढवावा असें सुचविलें. ह्या नोकरांत वरिष्ठ नोकरांचाहि समावेश होतो.

---

### रेल्वेजचा आतबट्ट्याचा व्यवहार

हिंदी रेल्वेजना अपेक्षेप्रमाणें नफा कसा होत नाहीं, ह्याची तपशीवार माहिती रेल्वेजचे फिनॅन्शिअल कमिशनर, मि. स्टेग, ह्यांनीं दिली. १९२८–२९ अखेर पांच वर्षेपर्यंत हिंदी रेल्वेज मध्यवर्ती सरकारास ठरल्याप्रमाणें वार्षिक रक्कम देत आल्या आणि त्यांनीं ह्या मुदतींत १८ कोटि रुपयांचा रिझर्व्हहि निर्माण केला. त्यानंतर रेल्वेजच्या हिशेबांत पुरेसा वाढावा न उरून रिझर्व्ह फंडांतून पैसे काढून घेण्याची पाळी आली. १९३०–३१ अखेर हा फंड जवळ जवळ संपुष्टांत आला. १९३१–३२ पासून १९३५–३६ अखेरपर्यंत रेल्वेजचा खर्च उत्पन्नांतून भागूं शकला नाहीं आणि घसारा फंडांतून पैसे घेऊन हिशेबाची तोंडमिळवणी करावी लागली. मध्यवर्ती सरकारचें देणें अर्थातच देतां आलें नाहीं. १९३८–३९ अखेरच्या ह्या देण्याची रक्कम ६६ कोटि रुपये झाली आणि तें देण्याची मुदत १९३७ मध्यें असेंब्लीनें १ एप्रिल १९४० पर्यंत वाढवून दिली. रेल्वेजची परिस्थिति न सुधारल्यामुळें पुनः ऑगस्ट, १९३९ मध्यें असेंब्लीनें ठराव करून मुदत ३१ मार्च, १९४२ पर्यंत वाढविली. हिंदी रेल्वेजची अशा प्रकारची असमाधानकारक परिस्थिति असल्याकारणानें मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन रेल्वेजचें उत्पन्न वाढविणें अपरिहार्य आहे, असा मि. स्टेग ह्यांच्या म्हणण्याचा आशय होता. बजेटाची तोंडमिळवणी करण्याचे इतरहि मार्ग आहेत, त्यांचा उल्लेख श्री. दत्त ह्यांनीं आपल्या भाषणांत अगोदरच केला होता. तथापि त्याकडे मि. स्टेग ह्यांनीं लक्ष पुरविलें नाहीं, असें दिसतें.

---

### सर ॲन्ड्र्यू क्लो ह्यांचें उत्तर

वहातुक खात्याचे प्रमुख, सर ॲन्ड्र्यू क्लो, ह्यांनीं आपल्या भाषणांत असेंब्लींतील चर्चेमधील मुख्य मुद्यांचा परामर्श घेतला. १९२८-२९ मध्यें रेल्वेजना आपले दर वाढवितां येणें शक्य असतांनाहि त्यांनीं ते वाढविले नाहींत आणि त्या वेळच्या वार्षिक ३ कोटि रुपयांच्या सवलती १९३१-३२ मध्यें काढून घ्याव्या लागल्या. मंदीच्या वेळीं वाईट दिवस म्हणून आणि चलतीचे दिवसांत लोकांस परवडतें म्हणून, म्हणजे नेहमीच रेल्वेचे दर वाढविण्याचें सरकारचें धोरण आहे, ह्या सर होमी मोदी ह्यांच्या टीकेस उत्तर देतांना १९३१-३२ च्या मंदीच्या काळांत रेल्वेजनीं दर कां वाढवले ह्याचें वरीलप्रमाणें त्यांनीं समर्थन केलें. मालाच्या बाजारभावांत कमालीची वाढ झाली असतांना रेल्वेजनीं आपले दर थोडेसे वाढविले, तर त्यांत चूक काय आहे ? असें ते म्हणाले. ह्या परिस्थितींत दर वाढविणें म्हणजे कर वाढविणें होत नाहीं. वाढलेल्या बाजारभावाचा फायदा कारखानदार, व्यापारी आणि दलाल घेत आहेत. मग सरकारनें त्यांत थोडा वाटा मागण्यास हरकत काय आहे ? असा त्यांचा मुद्दा होता. कारखानदार, व्यापारी, आणि दलाल ह्यांस मिळणारा फायदा त्यांच्या स्वतःच्या खिशांत पडणार असून, रेल्वेजनीं दरांत केलेल्या वाढीचा फायदा सर्वसाधारण हिंदी जनतेस मिळणार आहे असा त्यांनी दोहोंमध्यें भेद दाखविला. मध्यवर्ती असेंब्लीमध्यें काँग्रेस पक्षाचे सभासद कोणीच हजर नसल्याकारणानें तपशीलवार मागण्यांवरील आणि कपातसूचनांवरील वादविवाद प्रभावी न होणें अपरिहार्य आहे आणि सरकारास त्यामुळें विशेष त्रास न पडतां आपल्या मागण्या मंजूर करून घेतां येतील.

---

### युद्ध आणि रॉकेल तेल

आधुनिक युद्धांत यांत्रिक शस्त्रास्त्रांचा उपयोग वाढत्या प्रमाणांत होत असून त्यांचेसाठी तेलाचा पुरवठा भरपूर होणें अपरिहार्य झालें आहे. जर्मनी, इटली इत्यादि देशांस इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांप्रमाणें लढाऊ तयारीसाठी तेलाची तरतूद निर्वेध होईल अशी व्यवस्था करावी लागत आहे. अमेरिका व रशिया ह्या राष्ट्रांच्या स्वतःच्या मालकीच्या राकेल तेलाच्या खाणी असल्यानें त्या बाबतांत त्यांस मुळींच अडचण भासण्यासारखी नाहीं, एवढेंच नव्हे तर तेलाच्या दुसऱ्या देशांस व्हावयाच्या पुरवठ्यावर त्यांचें प्रभुत्व असल्याकारणानें त्यांस आर्थिक व राजकीय श्रेष्ठता प्राप्त झाली आहे. राकेल तेल बाहेरून आणावें लागल्यामुळें जर्मनीनें दगडी कोळशापासून तेल काढण्याचे प्रयत्न केले आहेत. प्रस्तुत युद्धांत इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांस त्यांच्या समुद्रावरील वर्चस्वाचे योगानें राकेल तेलाचा पुरवठा होण्यास पंचाइत पडावयाची नाहीं. पण जर्मनीस रशिया व रुमानिया ह्या निकटवर्ती देशांकडून तेलाच्या पुरवठ्याचे स्वरूपांत कितीशी मदत होऊं शकेल हा प्रश्न आहे. रशियाच्या तेलाच्या खाणी जर्मन सरहद्दीपासून फार दूर असून तिकडून तेल आणून तें जर्मनीस पुरवणें कठीण होणार आहे. रशिया व रुमानिया ह्यांचेबरोबर व्यापारी करार करण्याची जर्मनीची खटपट आहे ती तेलासारखा युद्धोपयोगी माल त्यांचेकडून मिळवण्याचें अगत्य वाटत असल्यानें चाललेली आहे. समुद्राचें द्वारानें

जर्मनीची नाकेबंदी दोस्त राष्ट्रांनीं केली आहे. ह्यामुळें पूर्वेच्या बाजूकडून खुष्कीच्या मार्गानें वाढवण्याची धडपड करणें त्यास प्राप्त आहे. रॉकेल तेलाचा फार मोठा साठा रशियाच्या भूगर्भात आहे आणि त्यापैकीं थोडाच भाग प्रत्यक्ष औद्योगिक स्वरूपांत प्रकट झालेला आहे. ह्या प्रश्नाचें महत्त्व लक्षांत यावें म्हणून रॉकेल तेलाचें जागतिक उत्पादन प्रतिवर्षी किती होतें, ह्याचें तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत.

रॉकेल तेलाचें जागतिक उत्पादन
( आकडे हजार टनांचे असेत )

| देश | १९१३ | १९२१ | १९३२ | १९३८ |
|---|---|---|---|---|
| अमेरिका | ३४,०३० | ६४,७१६ | १,०७,६४५ | १,७३००० |
| रशिया | ९,२३४ | ...... | २२,३१८ | ३०,००० |
| वेनेझुएला | ...... | २१८ | १७,०८५ | २७,००० |
| रुमानिया | १,८४८ | १,१६८ | ७,३४८ | ७,२०० |
| इराण | २४८ | २,२२२ | ६,५४९ | १०,२०० |
| मेक्सिको | ३,८३८ | २८,९७८ | ४,८४२ | ६,६०० |

## मुंबई प्रांताच्या इरिगेशन खात्याचा अहवाल

मुंबई प्रांतांत १९३८–३९ मध्यें २,७०,६५० एकर जमिनींस सरकारी कालव्यांचें पाणी मिळालें. १९३७–३८ मध्यें ३,२०,००६ एकर जमीन कालव्यांचे पाण्याखाली होती. वरील २,७०,६५० एकर जमिनींत खालीलप्रमाणें पिकें लावलेलीं होतीं:—

| | | | |
|---|---|---|---|
| ज्वारी : | ५१,७४० एकर | ऊंस : | ४३,१७१ एकर |
| भुईमूग : | १९,९२६ एकर | कपास : | १९,२२३ एकर |
| तूर : | १४,५१८ एकर | बाजरी : | १२,३६४ एकर |
| गहूं : | ९,५५६ एकर | तांदूळ : | ८,३९७ एकर |

महाराष्ट्रांतील कालव्यांचे पाण्यावर साखरेच्या ८ कारखान्यांनीं मिळून १६,२८४ एकर ऊंस लावला. गोदावरी लेफ्ट बँक कालव्यावर एक नवीन कारखाना १९३८–३९ मध्यें सुरू झाला.

कालव्याच्या पाण्याचें एकूण उत्पन्न ३२ लक्ष, ६ हजार रुपये झालें. १९३७-३८ मध्यें तें ३२ लक्ष ३६ हजार रुपये झालें होतें. व्यवस्थेचा खर्च वजा जातां १९३८-३९ मध्यें सरकारास १५ लक्ष, २७ हजार रुपये मिळाले. त्या पूर्वीच्या वर्षी १६ लक्ष, ९ हजार रुपये मिळाले होते. गुंतविलेल्या भांडवलावर खालीलप्रमाणें व्याज सुटलें:—

| | % |
|---|---|
| निरा लेफ्ट बँक कालवा आणि शेटफळ तलाव | ४·११ |
| निरा राइट बँक कालवा | ०·२७ |
| मुठा कालवे आणि मतोबा तलाव | २·८३ |
| गोदावरी कालवे | १·८२ |
| कृष्णा कालवा | १·७५ |
| गोकाक कालवा | ३·६७ |

## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा

या कायद्याची माहिती देण्यासाठी ता. २२-२-४० रोजीं, येवूर ( ता. वाळवे जि. सातारा ) येथें श्री. विनायक गणेश तिसे ( लेखक, " शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा आणि त्याचें विवेचन " ) यांनीं पांच दिवसांचा वर्ग सुरू केला. श्री. शंकरराव पाटील चेअरमन को. सु. युनियन येवूर यांच्या हस्तें या वर्गाचा उद्घाटन समारंभ झाला. त्या वेळीं श्री. शंकरराव बोमर, येवूर यांनीं प्रास्ताविक भाषण करून वर्गाचा उद्देश, उपयोग वगैरेची माहिती दिली. नंतर अध्यक्षांनीं वर्ग सुरू झाल्याचें जाहीर केलें.

या वर्गामध्यें शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा, त्याची अंमलबजावणी व कामकाजाची रूपरेषा याची माहिती देण्यात आली.

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या सभेंत प्रो. काळे ह्यांचें भाषण

डायरेक्टरांचा वृत्तांत, ताळेबंद व नफातोटापत्रक हीं मंजूर करावीं असा ठराव सभेपुढें मांडतांना प्रो. काळे ह्यांनीं निरनिराळ्या बाजूंनीं बँकेची प्रगति कशी होत आली आहे ह्याचें दिग्दर्शन केलें आणि भांडवल, ठेवी, रिझर्व्हज, कर्जें, सिक्युरिटीज ह्यांचे गेल्या चार वर्षांचे तुलनात्मक आकडे देऊन त्यां प्रगतीचें स्वरूप समजावून सांगितलें. ते म्हणाले:—"बँकांच्या व्यवहारांशीं संबंध असणाऱ्या सर्वांचे पुढें आज दोन प्रश्न उभे आहेत. युद्धामुळें उपस्थित झालेली परिस्थिति आणि रिझर्व्ह बँकनें बँकिंगच्या संबंधांत सुचवलेला स्वतंत्र कायदा हे ते होत. युद्ध परिस्थितीचा परिणाम कर्जरोख्यांचे भाव उतरण्यांत आणि व्याजाचे दर चढण्यांत होणें अपरिहार्य आहे. वेळप्रसंगीं उपयोगी पडावे आणि त्यांवर तरता पैसा उभा करतां यावा म्हणून आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत कर्जरोख्यांत पैसा बँकांनीं गुंतवणें अगत्याचें असतें. युद्धासारख्या प्रसंगांत असा पैसा उपयोगी पडतो, परंतु त्याबरोबरच रोख्यांच्या बाजारभावांत घट होते, त्याची तरतूद करावी लागते. आमच्या बँकेजवळील सर्व रोखे मुदतबंदी असल्यानें, त्यांची रोख रकम ठराविक वर्षी निश्चितपणानें मिळावयाची आहे. रोख्यांच्या बाजारभावांत चढउतार झाला तरी त्यांची खरेदीची किंमत व हातीं यावयाची दर्शनी किंमत ह्यांच्या फरकाची तरतूद वार्षिक नफ्यांतून बँकेनें प्रतिवर्षी केली म्हणजे तिच्या मजबुतीस सहाय्य होतें. आमच्या बँकेनें कॉन्टिजन्सी रिझर्व्हमध्यें रकमा टाकल्या आहेत, त्या वरील फरकाच्या मानानें अधिकच आहेत. येत्या पांच-दहा वर्षांत रोख्यांची मुदत संपेल तेव्हां भरपाई करावयाच्या रकमा मी आतां आपणांस वाचून दाखवल्या त्यांचे मानानें आमची गंगाजळी कितीतरी मोठी होणार आहे. रोख्यांचे भाव पुढें सुधारले तर तिचा आयताच मोठा संचय बँकेच्या जवळ राहील आणि ते आणखी घटले तर तो प्रत्यक्ष कामास लावतां येईल. नफ्याचा मोठा भाग बाजूस काढून ठेवावयाच्या बोर्डाच्या धोरणास आपणां सर्वांचा हार्दिक पाठिंबा आहे ह्याबद्दल मला आनंद वाटत आहे. जनरल रिझर्व्ह व कॉन्टिजन्सी रिझर्व्ह शिवाय संशयित व बुडित कर्जाबाबतच्या गंगाजळीसहि यंदापासून प्रारंभ करण्यांत आला आहे, हें आपण पाहतां.

"बँकांच्या बाबतींत कायदा करण्याचें घाटत आहे, त्याच्या मुख्य कल्पनांस व त्याच्या एकंदर योजनेस आमचा पूर्ण पाठिंबा आहे. रोकड, कर्जरोख्यांतली गुंतवण इत्यादि बाबतींत रिझर्व्ह बँकेनें जीं प्रमाणें निश्चित केलीं आहेत, त्यांस सर्वस्वीं अनुसरूनच आमच्या बँकेचा व्यवहार आहे हें ताळेबंदांतील आकड्यांवरून आपणांस दिसून येईल. रिझर्व्ह बँकेचें पूर्ण समाधान व्हावें अशीच त्याची व्यवस्था आहे हें ऐकून आपणांस अभिमान वाटेल. आमच्या बँकेचें भांडवल हळुहळु वाढत आहे आणि मुंबईच्या कचेरीची चांगली प्रगति होत आहे. नवा कायदा होईल तेव्हां ह्या बाबतींत योग्य तीं व्यवस्था होण्यास अडचण पडणार नाहीं. ठेवींचा पैसा मोठ्या प्रमाणांत कर्जांत गुंतवण्याचें व भरमसाटपणानें शाखा काढण्याचें धोरण अनिष्ट असल्याचें रिझर्व्ह बँकेनें म्हटलें आहे त्या बाबतींत आमच्या बँकेचे व्यवहार पायाशुद्ध आहेत. लहान, मध्यम आकाराच्या व मोठ्या कारखान्यांस व व्यापाऱ्यांस आमच्या बँकेचा चांगला उपयोग होत आहे आणि ह्या रीतीनें ही बँक स्थापन करण्यांतला मुख्य हेतु सफल झाला आहे. डायरेक्टरांनीं अत्यंत सावधगिरीचें धोरण स्वीकारलें आहे आणि त्यास मिळणाऱ्या यशांत त्यांच्यावर विश्वास ठेवणारी महाराष्ट्रीय जनता पूर्णपणानें भागीदार आहे. बँकेस लोकांनीं असेंच सहाय्य देऊन तिच्याकडून वाढत्या प्रमाणांत काम करून घ्यावें अशी माझी विनंति आहे. कित्येक डायरेक्टरांनीं स्वार्थत्यागपूर्वक बँकेस सहाय्य केलें आहे हें सांगणें माझें कर्तव्य आहे. बँकेच्या प्रगतीस सर्वांनीं असाच हातभार लावावा."

### ब्रिटिश एक्सचेंज ईक्वलायझेशन फंड

ग्रेटब्रिटनमधील आर्थिक परिस्थितीचें स्थैर्य पौंडाच्या परराष्ट्रीय किंमतींचे स्थैर्यावर अवलंबून आहे. हुंडणावळ बिघडली कीं, परराष्ट्रीय व्यापारास अडथळा उत्पन्न होईल आणि त्यामुळें आर्थिक घडी बिघडून जाईल. आज १ पौंडाची किंमत १७९ फ्रँक आहे, ती उद्यां समजा फक्त ५० फ्रँक झाली, तर काय परिस्थिति होईल ? जे ब्रिटिश कारखानदार फ्रान्समधून कच्चा माल मागवीत असत त्यांस त्याच मालाबद्दल अनेक पट किंमत द्यावी लागेल, कारण फ्रेंच मालाची किंमत फ्रँकमध्येंच देणें भाग पडेल. उलट, ब्रिटिश कारखानदारानें फ्रेंच गिऱ्हाइकांस माल विकला, तर कारखानदारास फ्रँकमध्यें पैसे मिळतील आणि त्यांचें पौंडांत रूपांतर केलें कीं, फारच थोडे पौंड होतील. अशा रीतीनें, फ्रान्स देशाशीं व्यवहारच करतां येणार नाहीं अगर तो केला तरी त्यांत फार नुकसान यईल. पौंडाची किंमत खाली जाण्यांत सट्टेवाल्यांचा फायदा आहे. एखाद्याजवळ समजा १ लक्ष पौंड आहेत. त्याचे त्यानें फ्रँक केले तर ते १ पौंड = १७९ फ्रँक ह्या दरानें १,७९,००,००० होतील. पॅरिसमधील बँकिंगच्या क्षेत्रांत कंड्या पिकवून पौंडाचा भाव खाली आणला आणि १ पौंड = ५० फ्रँक इतका तो झाला, तर १ लक्ष पौंडांची किंमत चौपट होईल. म्हणजे, १ लाखावर तीन लाख नफा होईल ! ह्या फ्रँकचें पौंडांत रूपांतर करून त्यांचीं ग्रेटब्रिटनमध्यें घरें अगर शेतें किफायतशीर घेतां येतील. जगांतील कोणत्याहि विभागांत अशा तऱ्हेचे पौंडावर आघात होऊं लागले तर त्यांचा प्रतिकार करणें हें एक्सचेंज ईक्वलायझेशन फंडाचें काम आहे. ह्या फंडांत अतिशय मोठी रक्कम असून प्रत्येक देशाच्या चलनांत फंडानें रकमा गुंतविलेल्या आहेत. ब्रिटिश चलनाची विक्री मोठ्या प्रमाणावर करण्यास कोणी प्रारंभ केला आणि त्यामुळें पौंडाच्या हुंडणावळीस धोका उत्पन्न झाला कीं, फंडांतील पैशानें तें चलन विकत घेण्यास प्रारंभ केला जातो. अर्थात्, हें काम गुप्तपणें केलें जातें. पौंडाचें डॉलरमध्यें रूपांतर करणारास, डॉलर बदलून पौंड घेणारेहि बाजारांत बरेच मोठे गिऱ्हाईक आहे असें आढळून आलें कीं, साहजीकच त्यास आपला व्यवहार थांबवावासा वाटतो. ह्या फंडाचें खरेदी-विक्रीचें कार्य जगांतील सर्व बाजारांत चालू असतें, त्यामुळें पौंडाची हुंडणावळ स्थिर राहूं शकते. मि. जी. एल. एफ. बोल्टन ह्यांचे नियंत्रणाखाली एक्स्चेंज ईक्वलायझेशन फंडाचें काम चालतें. बँक ऑफ इंग्लंडच्या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील आपल्या कचेरींतून, ४० वर्षांचे हे तज्ञ जगांतील चलन बाजाराचें निरीक्षण आणि नियंत्रण करीत असतात. मि. मॉंटेग्यू नॉर्मन ह्यांची जागा त्यांचे वाट्यास पुढेंमागें येईल, असें म्हणतात.

---

### दि सातारा नामदेव को. बँक लि. सातारा
### लिक्विडेशनचा हुकूम कायम

सातारा नामदेव को. बँक लि., सातारा ही संस्था रजिस्ट्रारसाहेब यांच्या हुकुमानें लिक्विडेशनमध्यें गेली होती व सातारा येथील को-ऑपरेटिव्ह कायद्याचे माहितगार वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांना लिक्विडेटर नेमलें होतें. रजिस्ट्रारचे सदर हुकुमाविरुद्ध बँकेच्या चालक मंडळानें मुंबई सरकारकडे अपील केलें होतें त्याचा निकाल नुकताच होऊन मुंबई सरकारनें सदर अपील फेटाळून रजिस्ट्रारनें काढलेला लिक्विडेशनचा हुकूम कायम केला आहे. श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांची एकट्याचीच लिक्विडेटर म्हणून नेमणूक कायम झाली आहे.


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

जळगांव.

( स्थापना : मे १९१६ )

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल...... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के. व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहारांच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

वी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

### बँक आणि खातेदार

जोगेंद्रनाथानें न्यू बेंगाल बँकेकडे कांहीं रकम ठेविली होती. त्याला रकमेची गरज पडली म्हणून त्यानें बँकेकडे वटविण्यासाठीं चेक पाठविला. तो चेक बँकेनें अमान्य ( डिसऑनर ) केला. चेकचे पैसे गरजेचे वेळीं न मिळाल्यामुळें जोगेंद्रनाथचें नुकसान झालें. तें नुकसान व चेक अमान्य झाल्यामुळें झालेलें अब्रुनुकसान भरून मागण्याकरितां त्यानें बँकेवर दावा आणला होता.

बँकेनें चेक अमान्य केला अथवा चेक वटविला नाहीं व यामुळें खातेदाराचें जर नुकसान झालें तर नुकसान बँकेनें भरून द्यावयास पाहिजे काय, हा मुख्य मुद्दा आहे. ज्या खातेदाराचे पैसे बँकेंत शिल्लक आहेत त्यानें पाठविलेला चेक वेळेवर वटविणें हें बँकेचें कर्तव्य आहे. बँकेनें आपलें कर्तव्य चोखपणें न पाळल्यामुळें जर खातेदाराला नुकसान सहन करावें लागलें असेल तर त्याला सर्वस्वी जबाबदार बँक आहे. नुकसानभरपाईची रकम ठरवितांना वेळेवर पैसे न मिळाल्यामुळें झालेलें खास नुकसान अथवा चेक अमान्य झाल्यामुळें होणारें सर्व स्वाभाविक नुकसान (ह्यांत पत येते) अवश्य विचारांत घ्यावें लागतें. खातेदार जर व्यापारी असेल तर रकम वेळेवर न मिळाल्यामुळें अथवा चेक अमान्य झाल्यामुळें जें नुकसान झालें असेल तें त्याला मिळेल.

खातेदारानें पाठविलेला चेक त्याचे खात्यांत रकम असल्यास तो वेळेवर वटविणें हें बँकेचें कर्तव्य आहे. चेक अमान्य करण्यानें खातेदाराचें दोन तऱ्हेनें नुकसान होऊं शकतें. एक असें कीं, वेळेवर रकम न मिळाल्यामुळें प्रत्यक्ष जें नुकसान झालें असेल तें व दुसरें असें कीं, चेक अमान्य झाल्यामुळें खातेदाराची जी पत जाते तें. कारण, खातेदाराचे पैसे शिल्लक नसतील तरच त्याचा चेक अमान्य होतो, असा प्रघात आहे. नुकसानभरपाईची रकम ठरवितांना ह्या दोन्हीं बाबी विचारांत घेण्यांत येतील. नुकसानभरपाई किती द्यावी हें प्रत्येक मुकद्दम्याच्या हकीकतीवर व वादीच्या दर्जावर अवलंबून राहील.

प्रस्तुत दाव्यांतील वादी मुखत्यार होता व त्याची मागणी ८,००० रुपयांची होती. परंतु ती त्याला सिद्ध करतां आली नाहीं म्हणून चेक अमान्य झाल्यामुळें जें अब्रुनुकसान झालें त्याद्दल कोर्टानें त्याला ५०० रुपयांची डिक्री दिली.

—"न्यायबोध"वरून.

---

### कानडी भाषेतून ब्रॉडकास्टिंग करा

"सुमारें १ कोटि, १२ लक्ष लोकांची मातृभाषा कानडी असून आणखी सुमारें ४० लक्ष लोकांस ती समजते. मुंबई, मद्रास, म्हैसूर, कलकत्ता आणि उस्मानिया विश्वविद्यालयांनीं तिला पदवी परीक्षेसाठीं मान्यता दिलेली आहे. मुंबई प्रांतांतील ४० लक्ष लोक आणि मद्रास प्रांतांतील २० लक्ष लोक ती भाषा बोलतात आणि संबंध म्हैसूर आणि निजामशाहींतील तीन जिल्हे हे कानडी आहेत. रेडिओ सेट्स असणारे सुमारें २ हजार लोक कानडी आहेत. मुंबई रेडिओ स्टेशनवरून पंधरवड्यांतून १५ मिनिटें एक वाङ्मय कार्यक्रम कानडीमधून होतो, त्याखेरीज हिंदुस्थानांतील कोणत्याहि स्टेशनवरून कानडी ऐकूं येत नाहीं. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व—पुश्तु आणि पर्शियन सुद्धा—भाषांतून बातमी सांगण्यांत येते, परंतु कानडीस मात्र मान्यता नाहीं." अशा प्रकारची तक्रार कानडी पुढाऱ्यांनीं केली आहे.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## पेढीवाल्यांच्या कर्जवसुलींतील अडचणी

(लेः—श्री. एम. आर. पराडकर बी. ए.)

पेढीचे सल्लागार (पेढीचे व्यवस्थापकास):—कसं काय मॅनेजर, फार चिंताग्रस्त दिसतां तुम्हीं !

पेढीचे व्यवस्थापकः—अहो काय करावं ! आम्हीं दिलेलीं कर्जे लवकर लवकर वसूल होत नाहींत हो !

सल्लागारः—म्हणजे, तुम्हीं कर्जांना तारणं भरपूर घेतलीं असतील ना ?

व्यवस्थापकः—कांहींचीं घेतलीं आहेत. कांहीं नुसत्या प्रॉमिसरी नोटांवर दिलीं आहेत.

सल्लागारः—प्रॉ. नोटांवर दिलेल्या कर्जांना बरींच वर्षे झालेलीं दिसत आहेत. अजून त्यांवरील कर्जें कशीं वसूल झालीं नाहींत ? असलीं कर्जें ५-६ महिन्यांत वसूल झालीं पाहिजेत. तुम्ही प्रॉ. नोटा नुसत्या फिरून नव्या करून घेतां वाटतं ? अन् प्रॉ. नोटा ५००—१,००० रकमेच्या एकट्याच्या नांवावर कशा घेतल्यात ? तुमच्या हिशेबतपासनिसाचा शेरा वाचला नाहीं वाटतं तुम्हीं ?

व्यवस्थापकः—बरेचसे प्रॉ. नोटवाले ओळखीचे आहेत. त्यांच्या भिडेस्तव प्रॉ. नोटा रिन्यू करून घेणें भाग पडलें. बाकी आमचें कृत्य कायदेशीर आहे.

सल्लागारः—धंद्यांत नुसता कायदा पाहून चालत नाहीं. व्यवहार आणि फायदाहि साधावा लागतो. व्यवहारांत भीड उपयोगी नाहीं; भीड भिकेची बहीण!

व्यवस्थापकः—प्रॉ. नोटांपैकीं कांहीं कर्जें आम्हीं संस्थानांतील लोकांना दिलीं आहेत. त्यांतली तर कवडी वसूल होत नाहीं.

सल्लागारः—फिर्यादी कां नाहीं लावल्यात तुम्ही त्या संस्थानी लोकांवर ?

व्यवस्थापकः—फिर्याद लावतां लावतां त्यांतच आमचा खर्च किती तरी झाला. संस्थानांतील कोर्टांत आम्हीं प्रथम फिर्याद लावली. तेथील खालच्या कोर्टानें, आम्हांला संस्थानांतील लोकांवर फिर्याद करतां येत नाहीं असें ठरविलें. परंतु तेथील हायकोर्टांत अपील केल्यावर आमचा फिर्याद करण्याचा हक्क शाबीद झाला व मग आम्हांला हुकूमनामे मिळाले. कांहीं संस्थानांतील कर्जदारांवर ब्रिटिश हद्दींतल्या कोर्टांत फिर्यादी लावल्या. त्यांत मिळालेल्या हुकूमनाम्यावर पुन्हां संस्थानांतील कोर्टांत फिर्यादी लावल्या तेव्हां हुकूमनामे मिळूं शकले.

सल्लागारः—इतकं करूनहि वसूल कांहींच झाला नाहीं म्हणतां !

व्यवस्थापकः—आमची फिर्याद लागेपर्यंत एका ऋणकोनें आपल्या जंगम इस्टेटीची विल्हेवाट लावली. आम्हीं त्याच्या घरीं जेव्हां माल जप्त करायला गेलों तेव्हां तो एका चटईवर पोथी वाचत बसला होता. कोपऱ्यांत एक शेगडी व २—३ भांडीं होतीं. काय जप्त करणार आम्ही ?

सल्लागारः—जंगम इस्टेट केव्हांहि चटकन् लांबवितां येते. बरं, ज्यांचीं घरं गहाण लावून घेतलीं आहेत त्यांच्या कर्जवसुलीची काय व्यवस्था आहे ? त्यांच्यावर भराभर फिर्यादी लावून वसुली केली का ?

व्यवस्थापकः—त्यांचेवर फिर्याद लावायला आमच्याजवळ पैसाच नाहीं. हें ज्यांना माहीत आहे ते म्हणतात आमच्यावर फिर्यादी खुशाल लावा, नाहींतर व्याजांत व मुदलांतहि सूट द्या.

सल्लागारः—ज्या कांहीं लोकांवर तुम्हीं फिर्यादी लावल्यात त्यांतील प्रतिवादी मूळ कर्ज घेणारेच होते का ? पुष्कळ वर्षांनीं फिर्यादी लावल्यात म्हणून म्हणतो, आणि त्यांच्या इस्टेटी तरी फिर्याद लावण्याच्या वेळीं त्यांच्याच नांवावर होत्या कां ?

व्यवस्थापकः—तुम्हीं अगदीं मुद्याचा प्रश्न विचारलात बुवा. कर्ज घेणारे तर मेलेच. म्हणून त्यांच्या मुलांचीं नांवें फिर्यादीवर, चढवावीं लागलीं, पण त्यांनीं बापाचीं कर्जें साफ नाकारलीं. म्हणे, बापानें कर्जाचे पैसे व्यसनांत घालविले आणि आम्हांला त्या पैशाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. म्हणून तें कर्ज आम्हांवर बंधनकारक नाहीं. आपल्या सद्वर्तनी बापाला हे लोक खुशाल व्यसनी म्हणतात. कांहीं नीतीची चाड आहे कीं नाहीं !

सल्लागारः—सध्यांचं नीतीचं युग राहिलं नाहीं. आर्थिक युग आहे सध्यांचं. कोणीकडून तरी पैसा खसायचा व जमवायचा हेंच ध्येय.

व्यवस्थापकः—आणि कांहींनीं तर आपल्या इस्टेटींची दुसऱ्याच्या नांवावर खोटीच विक्री केली. अन् आतां तो व्यवहार खोटा आहे हें आम्ही सिद्ध करायचं ! आमचा खिसा रिकामा करून वकिलांचा खिसा भरण्याची वेळ आली.

—आणखी सांगतों ऐका. चार भावांना (एकत्र कुटुंबांतील) कर्ज दिलं होतं. कर्जाच्या चौपट किंमतीचं घर लिहून घेतलें होत. पुढें दोन भाऊ मेले. मेलेल्या एका भावाचा मुलगाहि मेला म्हणून सून वारस झाली. तिनें पाट लावला. सध्यां पत्ताच लागत नाहीं कुठं आहे ती. तिला आतां प्रतिवादी करावं कीं नाहीं हा वकिलालाच प्रश्न पडला आहे.

सल्लागारः—एकंदरींत या कामांत तुम्हीं बरेच जेरीस आलांत असं दिसतं. बरं, शेतकऱ्यांना कांहीं कर्जें दिलीं नसलींत म्हणजे बरं.

व्यवस्थापकः—अहो, शेतकऱ्यांना सुद्धां आम्हीं कर्जें दिलीं आहेत. त्यांच्यावरील फिर्यादीच्या कटकटी तर विचारूंच नका. त्यांना कर्ज आम्हीं दिलं आहे, हें पूर्णपणें आम्हीं सिद्ध करायचं. त्या लोकांना पावतीवर सहीहि करतां येत नाहीं. पावतीवर अंगठा उठवितात. तो कोर्टांत नाकबूल करतात. मग त्या संबंधांतील तज्ञाची किंवा दस्तुर लिहिणाराची साक्ष काढावी लागते. बऱ्याच दिवसांनीं फिर्याद लाविली असल्यामुळें त्या दस्तुर लिहिणाराचा पत्ताच लागत नाहीं. इतकें केल्यावर सुद्धां शेतकरी अगदीं हलके हप्ते कोर्टाकडून मागून घेतो. अन् कोर्ट हलके हप्ते देतें. कोर्ट आणि कायदा जणूं शेतकऱ्यांच्याच बाजूचे असतात.

सल्लागारः—बर विमा पॉलिसीवर दिलेलीं कर्जें तर शाबूत असतील ना ? कारण विमा कंपन्या फारशा बुडत नाहींत.

व्यवस्थापकः—अहो, तें खरं, परंतु आम्हीं बरींचशीं कर्जें प्रॉव्हिडंट पॉलिसींवर दिलीं आहेत आणि त्यांतील बहुतेक कंपन्या बुडाल्या आहेत.

सल्लागारः—अरेरे ! मग त्या पॉलिसीवरील कर्जाची वाताहातच ! तुम्हीं कांहीं कर्जें माल तारण ठेवून दिलीं आहेत असें ऐकतों. तीं तरी कर्जें वसूल होतील कां ?

व्यवस्थापकः—आहो, आमचं दुर्दैव ! तारण मालाच्या किंमती

मरमसाट उतरल्या आहेत आणि कांहीं मालाची अफरातफरहि झाली आहे.

सल्लागार:—मग ज्या प्रमाणांत मालाची किंमत उतरली आहे त्या प्रमाणांत आणखी तारण घ्या.

व्यवस्थापक:—मी इतका गांगरून गेलों आहे कीं, काय करावं हेंच समजत नाहीं. फिर्यादी लावून कर्जदारांना दिवाळखोर बनवितां बनवितां आम्हीच दिवाळखोर बनण्याची वेळ आली आहे.

सल्लागार:—खरं आहे. आतां तेवढाच उपाय राहिला आहे. कर्जे देतांना जरा दूरदृष्टीनें अधिक सुरक्षित तारणें घेतलीं असतीं तर वसूलीची इतकी दगदग पडती ना!

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें साप्ताहिक पत्रक

(१६ फेब्रुवारी, १९४०)

### बँकिंगचा विभाग

| देणें | रु. |
|---|---|
| भांडवल भरलेलें | ५,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,००,००,००० |
| ठेवी:— | |
| (अ) सरकारी | |
| मध्यवर्ती सरकारच्या | ८,६६,९४,००० |
| ब्रह्मदेश सरकारच्या | २,१३,३९,००० |
| इतर सरकारी खातीं | ५,६३,५०,००० |
| (ब) बँकांच्या | १९,०८,७१,००० |
| (क) इतर | १,८३,७६,००० |
| बिलें द्यावयाचीं | ८,०८,००० |
| इतर देणी | १,१३,६८,००० |
| एकूण रु. | ४८,५८,०६,००० |

| येणें | रु. |
|---|---|
| नोटा:— | |
| (अ) हिंदुस्थानांत चालणाऱ्या | १३,६१,२६,००० |
| (ब) ब्रह्मदेशांत चालणाऱ्या | १३,९०,००० |
| रुपये (नाणें) | ३,६६,००० |
| चिल्लर (नाणें) | ३,१८,००० |
| विकत घेतलेल्या आणि डिस्कौंट केलेल्या हुंड्या | |
| (अ) अंतर्गत | ......... |
| (ब) बाहेरच्या | ......... |
| (क) हिं. सरकारचीं ट्रेझरी बिलें | ५,७०,३९,००० |
| परदेशांत ठेवी | १९,६४,०७,००० |
| सरकारास कर्जे व ॲडव्हान्स | १७,००,००० |
| इतर कर्जे व ॲडव्हान्स | १,००,००० |
| कर्जरोख्यांत गुंतविलेला पैसा | ८,३९,९७,००० |
| इतर येणें | ७०,६१,००० |
| एकूण रु. | ४८,५८,०६,००० |

### नोटांचा विभाग

देणें रु.

नोटा (अ) बँकिंग विभागांतील, १३,७५,१६,००० रु.

(ब) व्यवहारांत खेळत्या हिंदुस्थानांत आणि ब्रह्मदेशांत मिळून २,४१,११,४८,००० रु.

एकूण देणें २,५४,८६,६४,०००

येणें रु.

(अ) सोनें, नाणीं व पाटले

हिंदुस्थानांत ४१,५४,४८,००० रु.

हिंदुस्थानबाहेर २,८६,९८,००० रु.

पौंडांतले (स्टार्लिंग रोखे) ११३,५०,११,००० रु.

| | |
|---|---|
| (अ) ची बेरीज | १५७,९१,५७,००० |
| (ब) रुपये | ५८,६०,०४,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | ३८,३५,०३,००० |
| हिंदुस्थानांतल्या हुंड्या व इतर पतपत्रिका | ............ |
| एकूण येणें | २५४,८६,६४,००० |

### जागतिक व्यापार

राष्ट्रसंघाच्या व्यापारी मासिकाच्या जानेवारीच्या अंकांतखालील उपयुक्त माहिती आढळते:—"अमेरिकेचा सोन्याचा साठा डिसेंबरांत १६ कोटि,१० लक्ष सोन्याच्या डॉलर्सनी वाढला. औद्योगिक शेअर्सचे भावहि सर्वत्र वाढत आहेत. माल व फळफळावळ यांच्या किंमती स्थिर नाहींत. नेहमीं लागणाऱ्या ३० जिनसांच्या यादीची छाननी केली असतां असें आढळून येतें कीं त्यांतील तृतीयांश जिनसांची किंमत बेसुमार वाढली आहे. या वाढीला आळा घालण्याचा प्रयत्न मात्र सर्व ठिकाणीं चाललेला दिसतो. धातूंची किंमत लंडनमध्यें वाढली आहे तर न्यू यॉर्कमध्यें स्थिर आहे. साधारणतः युरोपच्या मानानें अमेरिकेंत भाव व किंमती स्थिर आहेत."

### फ्रान्समध्यें स्त्री समाजसेवकांची संघटना

फ्रान्समध्यें सरकारी कायद्यान्वयें स्त्री-समाजसेवकांची संघटना करण्यांत येत असून या संघटनेंत स्त्री-समाजसेवक तयार करणें, त्यांना योग्य शिक्षण देणें, त्यांच्याकडून युद्धोपयोगी कामें करवून घेणें, वगैरे कामासाठी कौन्सिलचे अध्यक्ष, संरक्षण मंत्री, महसूल मंत्री, वगैरे अधिकाऱ्यांना कामें वाटून दिलीं आहेत. या कायद्यामुळें स्त्रियांना युद्धांत आपला कामाचा वाटा उचलणें सोईस्कर झालें आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% कन्व्हर्शन लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—० |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९२–१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८९–११ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५—६ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०४—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०३—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११०—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२०—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३७—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३५—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५०५—० |
| पांचि मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०६—८ |
| **वीज** | |
| पांचि ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२८—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५०२—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५२—८ |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३७–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२९०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १३८—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७१—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पे ... | १९६७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | ११६—४ |




एजंट:—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय
हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०
हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.
हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its.

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND-PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( Estd. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,

तुळशीबागरोड :: नागपूर शहर

## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे धोरणावरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. कुपथ्य, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकाली गर्भपात, होणें पुसणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे, एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह एक ८ रुपये.

श्री इंडो फॉरिन एजन्सीज ( डि. बे. १ )
१५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.